Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 742 – 747
DOI: 10.5281/zenodo.10279504

Original Research Article

# महात्मा गांधीजींची सत्याग्रहाची संकल्पना

विकास दशरथ वाघमारे

संशोधक विद्यार्थी स्वा. रा. ती. म. वि. नांदेड ४३१६०६ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: vdwaghmare83@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

**प्रस्तावना**

महात्मा गांधीजींचा राष्ट्रपिता असा उल्लेख नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी 16 जुलै 1944 साली केला. भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्यां क्रांतिकारक, समाजसुधारक, योद्धा या सर्वांमध्ये महात्मा गांधीजींचे अद्वितीय स्थान आहे. गांधीजींचा जन्म 2 ऑक्टोबर 1869 रोजी गुजरात मधील पोरबंदर या गावी झाला. त्यांचे संपूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी असे होते. त्यांच्या आईचे नाव पुतळीबाई असे होते. त्यांच्या आई धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. गांधीजीवर धार्मिक संस्कार त्यांच्या आईकडूनच झालेले होते.

गांधीजी 1887 साली मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. लागलीच ते उच्च शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला गेले. आणि बॅरिस्टर होऊन मायदेशी परतले. इंग्लंडमध्ये राहूनही तेथील वातावरणाने ते भारावून गेले नाहीत. पाश्चात्य राहणीमानाने ते कधी आकर्षित झाले नाहीत. परदेशामध्येही त्यांनी भगवतगीता, कुराण, बायबल याचा अभ्यास केला. यातूनच गांधीजींच्या भावी जीवनाची वाटचाल सुरू झाली. गांधीजींवर भगवत गीता या ग्रंथाचा फार मोठा प्रभाव होता. गांधीजी भगवतगीतेला Geeta is my mother असे म्हणत असत. गांधीजी वर गौतम बुद्धांच्या आणि महावीरांच्या अहिंसा तत्वाचा फार मोठा प्रभाव पडलेला होता त्यांनी अहिंसा हे तत्व बौद्ध आणि जैन तत्त्वज्ञानातूनच स्वीकारले होते. बॅरिस्टर होऊन गांधीजी भारतात परत आल्यानंतर त्यांनी वकिली व्यवसाय सुरू केला. एवढ्यातच त्यांना पोरबंदर मधील एका मेमन पिढीतर्फे दक्षिण आफ्रिकेला दावा चालविण्यासाठी जाण्याची संधी मिळाली. या संधीतून गांधीजींच्या जीवनाला नवीन कलाटणी मिळाली.

महात्मा गांधीजींच्या विचारांवर रस्किन थोरो आणि टॉलस्ट्राय या विचारवंतांच्या विचारांचा प्रभाव पडलेला होता, आणि तो पुढे गांधीजी ह्यात असेपर्यंत टिकून राहिला. गांधीजींनी रस्किनच्या An To This Last या पुस्तकातील विचार अंमलात आणण्यासाठी त्यांनी या पुस्तकाचे गुजराती भाषांतर सर्वोदय असे केले.

टॉलस्टाय या विचारवंताच्या Kingdom of God या ग्रंथातील "ईश्वराचे साम्राज्य तुमच्यात आहे "या संदेशामुळे गांधीजी भारावून गेले आणि त्यांनी टॉलस्टॉय फार्म ची स्थापना 30 मे1920 रोजी केली. गांधीजी 21 वर्षे दक्षिण आफ्रिकेत राहिले. तेथे त्यांनी गोऱ्या लोकांच्या जुलमी, अन्यायी, शोषण करणाऱ्या सत्तेविरुद्ध लढा दिला, आणि त्यात ते यशस्वी झाले. या सत्याग्रहाचा वापर जनआंदोलनासाठी व भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी गांधीजींनी केला.

1 ऑगस्ट 1920 ला टिळक युग संपले, आणि गांधी प्रवाहाला सुरुवात झाली.याच काळात गांधींनी रौलेट अक्ट, जालियनवाला बाग या प्रकरणी सरकार विरुद्ध अहिंसात्मक मार्गाने असहकार आंदोलन सुरू केले. या आंदोलनाचा परिणाम म्हणून गांधीजींना तुरुंगवास झाला. याच सुमारास लॉर्ड आयर्विन यांच्याशी गांधीजींनी करार केला तो गांधी आयर्विन करार म्हणून प्रसिद्ध आहे.तसेच इ.स. 1932 साली गोलमेज परिषद इंग्लंडला भरली. या परिषदेत स्वतंत्र मतदार संघ या बाबत चर्चा घडून आली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली ती मान्य झाली. या मागणीला गांधीजीने विरोध केला आणि येरवाडा तुरूंगात उपोषण धरले. येथे गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्यात 24 सप्टेंबर 1932 रोजी पूणे करार घडून आला.

महात्मा गांधींनी 1942 साली चले जाव चळवळ सुरू केली. करेंगे या मरेंगे असा जनतेला आदेश दिला. या चळवळीतून ब्रिटिश सरकारचा पाया खिळखिळ केला, आणि भारत देशाला 15 ऑगस्ट 1947 साली स्वातंत्र्य मिळाले. दिल्लीमध्ये शांतता नांदावी यासाठी गांधींनी बिर्ला भवन परिसरात सामुदायिक सर्वधर्मीय प्रार्थना करण्याचा कार्यक्रम सुरू केला दिनांक 30 जानेवारी 1948 रोजी नथुराम गोडसे या नावाच्या व्यक्तीने पिस्तूलातील गोळया झाडून गांधीजींचा खून केला. जाने या देशाला अहिंसेच्या माध्यमातून स्वातंत्र्य मिळवून दिले अशा या महान नेत्याची हिंसात्मक मार्गाने हत्या व्हावी याच्याएवढी दुर्दैवी घटना कोणतीच नाही.

या शोध प्रबंधात महात्मा गांधींनी जगाला दिलेली अपूर्व देणगी म्हणजे सत्याग्रह होय. अहिंसा, रामराज्य, विश्वस्त संकल्पना, ग्राम स्वराज्याची संकल्पना इत्यादींचा सविस्तरपणे अभ्यास करण्यात येणार आहे. सत्याग्रह म्हणजे काय? सत्याग्रहाचा नेमका अर्थ काय? सत्याग्रहाचे विविध साधने कोणकोणते आहेत? सत्याग्रह करण्याची नियमावली कशी आहे? अशा अनेक प्रश्नांची उकल गांधीजींच्या तत्त्वज्ञानातून कशी होत जाते याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाचा उद्देश**

१. सत्याग्रहाच्या संकल्पनेचा अर्थ, व्याख्या याचा आढावा या शोध प्रबंधातून घेतला जाणार आहे.
२. भारतातील लोकशाही महात्मा गांधींच्या सत्याग्रहातून कशी विकसित झाली आहे याचा आढावा घेणे.
३. महात्मा गांधींनी सांगितलेले सत्याग्रहाचे विविध मार्ग किंवा साधने याचा सविस्तर अभ्यास करणे.
४. सद्यस्थितीत गांधीजींची सत्याग्रहाची संकल्पना कशी महत्त्वपूर्ण आहे याचा अभ्यास करणे.

**सत्याग्रहाचा अर्थ**

सत्याग्रहाचा अर्थ पाहत असताना सत्याग्रह हा शब्द संस्कृत शब्द आहे. सत्याग्रह हा शब्द सत्य आणि सत्याग्रह या दोन शब्दापासून बनला आहे. म्हणून सत्याग्रहाचा शब्दशः अर्थ सत्याचा आग्रह असा होतो.

**सत्याग्रहाची व्याख्या**

१. सत्याला चिकटून राहणे म्हणजे सत्याग्रह होय. गांधीजी असे म्हणतात की, सत्याग्रह म्हणजे सत्य बळ, सत्य प्रेमाचे बळ आणि नीतीचे बळ होय.

२. महात्मा गांधीजींच्या मते, सत्याग्रह म्हणजे आत्मिक शक्तीच्या जोरावर अन्याय व पिळवणुकीच्या विरोधात केलेला प्रतिकार किंवा प्रत्यक्ष कृती म्हणजे सत्याग्रह होय.

३. स्वत: यातना, कष्ट सहन करून सत्याचे रक्षण करणे म्हणजे सत्याग्रह होय.

वरील सत्याग्रहाच्या व्याख्येतून असा निष्कर्ष निघतो की, सत्याग्रह सत्याला महत्त्व देणारी संकल्पना आहे. सत्याग्रही भारतीय समाज मनाला सत्यावर चालायला शिकवणारी संकल्पना आहे.

महात्मा गांधींनी सत्याग्रहाची संकल्पना विश्व विचारांना दिलेली अभिजात देणगी आहे. परकीय राजवटीतून मुक्ती मिळविण्यासाठी गांधींनी सत्याग्रहाच्या संकल्पनेला जन्मास घातले, असे असले तरी जगातील अनेक देशात आधुनिक काळात निर्माण झालेल्या नवनवीन समस्या, प्रश्न, अडथळे, अडचणी सोडविण्यासाठी आणि अन्यायाचे निवारण करण्यासाठी सत्याग्रहाचा अवलंब केला गेला पाहिजे. असे स्पष्ट होताना दिसते.

**सत्याग्रहाची साधने किंवा मार्ग**

महात्मा गांधींनी सत्याग्रहाची प्रतिपादित केलेली साधने पुढील प्रमाणे आहेत.

१. असहकार

२. सविनय कायदेभंग

३. उपोषण

४. हरताळ

५. बहिष्कार

६. हीजरत

७. निरोधन

८. धरणे

गांधींनी सांगितलेले हे सर्व सत्याग्रहाचे मार्ग आणि साधने आहेत याचा आढावा पुढीलप्रमाणे घेऊ या.

**१. असहकार**

महात्मा गांधी यांच्या सत्याग्रहातील पहिला मार्ग म्हणजे असहकार होय असहकार म्हणजे जुलमी कायद्याच्या विरोधामध्ये उचललेले हत्यार होय. गांधीजींनी ब्रिटिश शासन विरोधी असहकार चळवळ सुरू केली. ब्रिटिश

सरकारकडून भारताची मोठ्या प्रमाणात पिळवणूक होऊ लागली अत्याचाराचे प्रमाण वाढले आणि यासाठी भारतातील नागरिक जबाबदार होते. म्हणून त्यांनी भारतातील नागरिकांना असहकार या सत्याग्रहाच्या मार्गातून ब्रिटिशांच्या कायद्याचं पालन न करणे. याकरिता 1930 साली असहकार आंदोलन गांधीजींनी चालविले. ब्रिटिशांनी दिलेल्या पदव्या, किताब, यांचा त्याग करणे सरकारी कार्यक्रमावर बहिष्कार टाकणे. सरकारी शिक्षण संस्थामधून मुलांना काढणे .कोर्ट कचऱ्यांवर बहिष्कार टाकणे. कायदेमंडळावर बहिष्कार टाकणे .इत्यादी मार्गाचा अवलंब असहकार या मार्गाद्वारे गांधींनी केला.

**२. सविनय कायदेभंग**

भारताच्या राजकीय चळवळीला जेव्हा हिंसक वळण मिळणार असे दिसू लागले, तेव्हा ते टाळण्याकरिता गांधीजींनी १९३० मध्ये सविनय कायदेभंगाची घोषणा केली. १२ मार्च १९३० रोजी ते साबरमती आश्रमातून स्वराज्य मिळाल्याशिवाय परत येणार नाही, अशी प्रतिज्ञा करून समुद्रकिनाऱ्यावरील दांडीकडे मिठाचा कायदा तोडण्याकरिता ७२ सत्यागही वीरांसह गेले. अन्याकारी कायदा मोडीत काढण्यासाठी सविनय कायदेभंगाची चळवळ गांधींनी देशांमध्ये चालवली आहे.

**३. उपोषण**

उपोषण हे सत्याग्रहाचे अतिशय प्रभावी साधन आहे हे साधन योग्य वेळीच वापरले गेले पाहिजे असे गांधीजींचे मत आहे. उपोषण करणारे व्यक्ती आत्मबल संयमी असते. उपोषण करणारी व्यक्ती अहिंसेचे पालन करणारी असावी लागते. संयमी असावी लागते. वीर आणि शूर असावी लागते. उपोषण म्हणजे स्वतः त्रास यातना सहन करून आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी सत्ताधिशांचे हृदय परिवर्तन करणे यालाच उपोषण असे म्हणतात. अनेकांनी उपोषणाच्या माध्यमातून आज आपल्या देशामध्ये सरकारचे हृदय परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून भारतातील लोकशाहीला महात्मा गांधींनी सत्याग्रहाच्या माध्यमातून दिलेला एक प्रभावी मार्ग म्हणजे उपोषण होय.

**४. हरताळ**

सत्याग्रहाच्या साधनांमधील एक अत्यंत महत्त्वपूर्ण मार्ग म्हणजे हरताळ होय. या मार्गाचा अवलंब विचारपूर्वक केला गेला पाहिजे असे गांधीजी म्हणतात हरताळ करत असताना पूर्वकल्पना देऊन या मार्गाचा वापर केला गेला पाहिजे. याही मार्गाच्या माध्यमातून सरकारी यंत्रणेचे ह्रदय परिवर्तन केले गेले पाहिजे. हरताळ म्हणजे संप पुकारणे, बाजारपेठा बंद करणे, याला हरताळ असे म्हणतात. असा एक साधा सरळ मार्ग महात्मा गांधींनी जगाला दिलेला आहे.

**५. बहिष्कार**

सत्याग्रहाच्या मार्गातील बहिष्कार हा अतिशय महत्त्वाचा मार्ग आहे असे गांधीजींचे मत आहे. तत्कालीन परिस्थितीमध्ये परदेशी मालावर बहिष्कार टाकणे. परदेशी शिक्षणावर बहिष्कार टाकणे. बहिष्कार या साधनाचा वापर सामाजिक राजकीय दोन्ही क्षेत्रांमध्ये केला जाऊ शकतो परंतु हा मार्ग कोणाच्या दबावाखाली येऊन करता कामा नये असे गांधीजींचे मत आहे. 2015 साली भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परकीय मालांचा आपण वापर करू नये अशा

पद्धतीची घोषणा केली होती आणि ही कुठेतरी महात्मा गांधीजींच्या बहिष्कार या संकल्पनेची जुळताना दिसून येते. असा एक साधा सरळ सत्याग्रहाचा मार्ग गांधींनी भारतीयांना दिलेला दिसून येतो.

**६. हीजरत (देशत्याग)**

महात्मा गांधी यांनी प्रतिपादित केलेल्या सत्याग्रह मार्गातील एक मार्ग म्हणजे हीजरत होय. हीजरत म्हणजे एखाद्या समूहावर सतत अन्याय होत असेल त्यांचा मान अभंग होत असेल आणि हा समूह जो अन्याय करणारा वर्ग आहे त्यांचा अहिंसक मार्गाने प्रतिकार करू शकत नाही. तेव्हा त्या समूहाने देश सोडून जावे त्याला हिजरत असे म्हणतात. हा एक मार्ग गांधीजींनी सांगितलेला आहे. आज 21 शतकात भारतातील महाराष्ट्र राज्यात सातारा जिल्ह्यातील बेडग या गावी तेथील लोकांवर अत्याचार होत असताना तेथील लोकांनी गांधीजींच्या हीजरत या मार्गाचा अवलंब केलेला दिसून येतो.

**७. निरोधन**

गांधीजींच्या मते निरोधन म्हणजे प्रतिबंध होय. जो कोणी अन्याय, अत्याचार, करतो त्याच्याविरुद्ध निरोधन या मार्गाचा अवलंब करावा असे गांधीजी म्हणतात. अन्याय करणाऱ्या व्यक्तीला त्याच्या कृत्याची जाणीव करून देणे आणि त्याचे मत परिवर्तन करणे. गांधीजींनी या मार्गाचा वापर दारूबंदीसाठी आणि परदेशी मालावर बहिष्कार करण्यासाठी केलेला होता.

**८. धरणे**

महात्मा गांधींनी सांगितलेल्या सत्याग्रहाच्या मार्गातील एक महत्त्वपूर्ण मार्ग म्हणजे धरणे होय. गांधीजी म्हणतात या मार्गाचा वापर अत्यंत काळजीपूर्वक केला गेला पाहिजे. धरणे म्हणजे अन्यायी अत्याचारी व्यक्तीला जननेंद्रियाद्वारे लज्जित करणे होय. त्याला शरमेने मान खाली घालायला लावणारे शस्त्र म्हणजे धरणे होय. अन्याय करणाऱ्या व्यक्तीला तो अन्याय करत आहे, याची जाणीव करून देणे, आणि ही बाब जनतेसमोर आणणे यासाठी या मार्गाचा अवलंब केला जातो. अन्याय करणाऱ्या व्यक्तीला त्याची चूक लक्षात आणून देण्यासाठी हा मार्ग गांधींनी सांगितलेला आहे. परंतु हा मार्ग अवलंबत असताना हिंसेच्या मार्गाचा स्वीकार सत्याग्रहीने करू नये असे गांधीजी म्हणतात.

**निष्कर्ष**

वरील प्रस्तुत शोध प्रबंधातून असा निष्कर्ष स्पष्ट होतो की, महात्मा गांधी यांनी अहिंसा आणि सत्याग्रहाच्या माध्यमातून भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले आहे. गांधीजी यांनी भारतातील लोकशाहीला विकसित करण्याच्या उद्देशाने वरील सत्याग्रहाची संकल्पना प्रतिपादित केलेली आहे. त्यांच्या या सत्याग्रहाच्या संकल्पनेतून सर्वसामान्य माणसाला जीवन जगण्याची दिशा मिळते. सत्याग्रहाच्या या वरील साधनांच्या माध्यमातून लोकशाही विकसित होण्यासाठी फार मोठी मदत होताना दिसून येते. सविनय, कायदेभंग बहिष्कार, हिजरत, असहकार, निरोधन धरणे, उपोषण या मार्गाचा अवलंब सत्याग्रहींनी अतिशय विचारपूर्वक करावा, कारण या मार्गाद्वारे मन परिवर्तन घडून येताना दिसून येते हे या प्रबंधातून स्पष्ट होते.

**संदर्भ सूची**


१. राज्यशास्त्र सेट/नेट - बी. वाय कुलकर्णी

२. भारतीय राजकीय विचारवंत - भा. ल. भोळे

३. पाश्चिमात्य आणि भारतीय राजकीय विचारवंत - प्रभा कस्तूरे

४. भारतीय राजकीय विचारवंत - श्रीकांत देशपांडे

५. राजनीती विज्ञान नेट/ सेट - सुरेंद्र कौशिक

६. भारतीय राजकीय विचारवंत - पी. डी. देवरे, डी.एस. निकुंभ

७. आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत - वा. भा. पाटील

८. राज्यशास्त्र सेट /नेट - महादेव गव्हाणे

९. दै. लोकसत्ता

१०. गुगल

११. इंटरनेट